23-04-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 04/22/2025 11:33 PM Page 1



दक्षिण गोव्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव गंभीर पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



आयटीआयमध्ये प्रशिक्षण घेतल्यास नोकरीची संधी उपलब्ध : मुख्यमंत्री पान ४ वर

वेर्णा, बुधवार, २३ एप्रिल २०२५ । पाने ४ । ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 230 | Verna, | facebook.com/dainikherald | Wednesday 23 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### एमपी-राजस्थानसह सात राज्यांत उष्णतेच्या लाट

**नवी दिल्ली, दि. २२ :** मंगळवारी हवामान खात्याने मध्य प्रदेश आणि राजस्थानसह ७ राज्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. पुढील काही दिवसांत राजस्थानमधील तापमान पुन्हा वाढू शकते. तीन ते चार दिवसांत तापमान २ ते ३ अंशांनी वाढू शकते. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा सलग दुसऱ्या दिवशी ४५.६ अंश तापमानासह देशातील सर्वात उष्ण जिल्हा राहिला. मध्य प्रदेशातही उष्णतेची लाट कायम आहे. सोमवारी २७ शहरांमध्ये पारा ४० अंश किंवा त्याहून अधिक होता. ४४ अंश तापमानासह सिद्धी पुन्हा एकदा राज्यातील सर्वात उष्ण राहिले. त्याच वेळी, छत्तीसगडमधील चार जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देखील जारी करण्यात आला आहे. येथे, हवामान खात्याने २० राज्यांमध्ये वादळ आणि पावसाची शक्यता वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या आठवड्यात देशाच्या ईशान्येकडील राज्यांमध्येही असेच हवामान राहण्याची शक्यता आहे.

### पोप फ्रान्सिस यांच्यावर २६ रोजी अंत्यसंस्कार

**व्हॅटिकसिटी, दि. २२ :** कॅथोलिक ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांच्यावर अंत्यसंस्कार २६ रोजी होणार आहेत. व्हॅटिकनने ही माहिती दिली. त्यांच्या मृत्यूनंतरचा त्यांचा पहिला फोटोही प्रसिद्ध झाला आहे. त्यांचे पार्थिव शवपेटीत ठेवण्यात आले आहे. पार्थिवाच्या जवळ धार्मिक नेत्यांनी प्रार्थना केली. अंत्यसंस्काराची तयारी आजपासून सुरू होईल. कॅथोलिक चर्चचे कार्डिनल्स (याजक) आज व्हॅटिकनला येतील. जगभरातील नेते आणि सामान्य लोक अंत्यसंस्कारात एकत्र येतील. पोप यांचे सोमवारी वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. व्हॅटिकनने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार सकाळी ७.३५ वाजता पोप यांनी अखेरचा श्वास घेतला. व्हॅटिकनच्या मते पोपचा मृत्यू स्ट्रोक आणि हृदयविकाराच्या झटक्याने झाला. इटालियन माध्यमांनी असेही वृत्त दिले आहे की पोप यांना ब्रेन स्ट्रोकमुळे मेंदूत रक्तस्राव झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर पोपचे शरीर सार्वजनिक दर्शनासाठी शवपेटीत ठेवले जाते. मृतदेहाजवळ धार्मिक प्रार्थना केल्या जात आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर पोपचे शरीर सार्वजनिक दर्शनासाठी शवपेटीत ठेवले जाते. मृतदेहाजवळ धार्मिक प्रार्थना केल्या जात आहेत.

### प्रशिक्षण विमान कोसळले; एकाचा मृत्यू

**अमरेली, दि. २२ :** गुजरातमधील अमरेली येथील गिरिया रोडवरील एका निवासी भागात पायलट प्रशिक्षण केंद्राचे विमान कोसळले. या अपघातात पायलटचा मृत्यू झाला आहे. विमान कोसळल्यानंतर मोठा स्फोट झाला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक आणि पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले. अमरेली पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान एका खासगी कंपनीचे होते. हे विमान वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी वापरले जात होते. विमानात फक्त एकच पायलट होता, ज्याचा मृत्यू झाला. त्या वैमानिकाचे नाव अनिकेत महाजन आहे. गेल्या महिन्यात मेहसाणा येथील एका गावाच्या बाहेर हवाई दलाचे जग्वार लढाऊ विमान कोसळले होते. विमानाने जामनगर हवाई दल स्थानकावरून उड्डाण केले. या अपघातात एका वैमानिकाचा मृत्यू झाला तर एक गंभीर जखमी झाला.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७ ↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# काश्मीरमध्ये पर्यटकांवर दहशतवादी हल्ला

## २६ ठार, २० गंभीर; देशभरातून हल्ल्याचा निषेध : काश्मीर बंदची हाक : पर्यटक परतीच्या मार्गावर

**श्रीनगर, दि. २२ : दक्षिण काश्मीरमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळ पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात किमान २६ जणांचा मृत्यू, तर १० जण जखमी झाल्याची माहिती सरकारी सूत्रांनी दिली आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. मृतांमध्ये काही परदेशी पर्यटकांचाही समावेश असल्याचे सांगितले जात आहे. जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मृतांची अंतिम संख्या अद्याप निश्चित करण्यात आलेली नसल्याचे सांगितले असून, हा हल्ला अलीकडच्या काळात नागरिकांवर झालेल्या कोणत्याही हल्ल्यापेक्षा अधिक गंभीर आहे, असे त्यांनी म्हटले आहे.**







बॅसरन परिसरात झालेल्या या हल्ल्यात अज्ञात दहशतवाद्यांनी पर्यटकांच्या दिशेने जवळून गोळीबार केला. बॅसरन हे कुरण फक्त पायी किंवा घोड्यावरून पोहोचता येते, आणि त्या दिवशी सकाळी पर्यटकांचा एक गट तिथे गेला होता, अशी माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली आहे. हल्ल्याच्या वेळी घडलेली दृश्यं अत्यंत भयावह होती. एका व्हिडिओमध्ये एका महिलेला अश्रू ढाळत आपल्या पतीला वाचवण्याची विनवणी करताना दिसते. माझ्या पतीला वाचवा, कृपया! असे ती वारंवार म्हणताना ऐकू येते.दुसऱ्या प्रत्यक्षदर्शिनीने सांगितले की, ती भेळपुरी खात असताना एक बंदूकधारी तिच्या पतीकडे आला व गोळी झाडली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, जखमींना वाचवण्यासाठी हेलिकॉप्टरच्या मदतीने रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यात आले. काही जखमींना स्थानिकांनी घोड्यांवरून खाली आणून मदत केली.या हल्ल्यामुळे काश्मीरमध्ये पुन्हा एकदा असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षाबळांकडून परिसरात सर्च ऑपरेशन सुरू आहे.

या हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तातडीने जम्मू-काश्मीरमध्ये पोहोचले आहेत.अमित शाह यांनी एक्स या सोशल मीडियावर लिहिलंय की, पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या कट्टरतावादी हल्ल्यामुळे मला दु:ख झालं आहे. या हल्ल्यात मारले गेलेल्या लोकांच्या कुटुंबाबरोबर माझ्या संवेदना आहेत.अमित शाह म्हणाले की, या हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्यांना सोडलं जाणार नाही आणि त्यांना पूर्ण ताकदीनं उत्तर दिलं जाईल. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.राहुल गांधी म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात पर्यटकांचा मृत्यू आणि अनेकजण जखमी झाल्याची घटना निंदनीय आणि मन हेलावून टाकणारी आहे. सरकारनं जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती सामान्य असल्याच्या थापा मारण्यापेक्षा योग्य ते पाऊल उचलून कारवाई करावी. जेणेकरुन अशा घटनांना आवर घालता येईल आणि निर्दोष भारतीयांना आपला जीव गमवावा लागणार नाही. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या हल्ल्याला मानवतेवरील कलंक म्हणत राष्ट्रीय सुरक्षेची पुनर्रचना करण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी या हल्ल्याला काश्मीरच्या शांतता आणि समृद्धीच्या आशेवरचाच घात असे म्हटले. हा केवळ भारतावरील नव्हे, तर काश्मीरच्या लोकांच्या शांततेत राहण्याच्या हक्कावरही आघात आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

मंगळवारी झालेल्या या हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी या परिसराला वेढा घातला. तसंच, वैद्यकीय टीमदेखील घटनास्थळी पोहोचली आहे. या हल्ल्यातील जखमींना अनंतनागमधील सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये दाखल करण्यात आलं आहे. या दहशतवादी हल्ल्यात भारतीय नौदलाचे एक अधिकारी शहीद झाले असून दोन पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. घटनास्थळी अजूनही तणावाचे वातावरण आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी एएनआयला दिलेल्या माहितीनुसार, लेफ्टनंट विनय नरवाल हे कोची येथे तैनात होते. सध्या रजेवर असलेल्या नरवाल यांचा पहलगाम हल्ल्यात मृत्यू झाला. ते मूळचे हरियाणाचे असून १६ एप्रिल रोजी त्यांचा विवाह झाला होता.

हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र शब्दांत निषेध करतो. या दुर्दैवी घटनेत जीव गमावलेल्या पर्यटकांच्या कुटुंबीयांप्रती मी मनःपूर्वक सहवेदना व्यक्त करतो. जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करतो, असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांनी हल्ल्याचा निषेध करत काश्मीर 'बंद'ची हाक दिलीआहे. निरपराधांच्या हत्या थांबवण्यासाठी आता एकत्र येण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी देखील हल्ल्यात त्यांच्या राज्यातील काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले. हे क्रूर आणि विवेकबुद्धीला हादरवणारे कृत्य असून, प्रभावित कुटुंबांना सर्वतोपरी मदत केली जाईल,असे ते म्हणाले.

# महामार्ग अधिकारी आणि रहिवाशांत खडाजंगी

## ग्रामस्थांची बायपासची मागणी कायम | भोम गावात तणावाची परिस्थिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २२ :** पणजी - फोंडा राष्ट्रीय महामार्ग विस्तारीकरणासाठी रस्त्याचे मोजमाप सुरू असताना मंगळवारी भोम गावात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. स्थानिक ग्रामस्थांनी एकत्र येत या योजनेला तीव्र विरोध दर्शवला आणि प्रस्तावित रस्ता गावातील मंदिरे, सांस्कृतिक वारसा आणि पर्यावरणासाठी विनाशकारी ठरेल, असा आरोप केला.



ग्रामस्थांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना विरोध करत बायपास रस्त्याची मागणी लावून धरली. सरकारने गावातील संस्कृती आणि पर्यावरणाचे रक्षण करावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अधिकाऱ्यांनी दिशाभूल करू नये, असेही आवाहन ग्रामस्थांनी केले. या वेळी परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता सतेंद्र भोबे आणि सहाय्यक अभियंता चंद्र परवार यांनी भोम येथे प्रकल्पाचे मोजमाप दाखवण्यासाठी भेट दिली होती. मात्र, २५ मीटरच्या आत सहा पदरी उड्डाणपूल प्रस्तावित असल्याचे मार्किंग स्थानिकांना मान्य नव्हते. या संदर्भात स्थानिकांनी आधी मुख्यमंत्री सावंत यांच्यासमवेत झालेल्या बैठकीतील आश्वासनांचा पुनरुल्लेख करत म्हटले की, आम्हाला उड्डाणपुलाचे खांब, पाया आणि अन्य संरचनेविषयी स्पष्ट माहिती देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र प्रत्यक्षात केवळ मोजमाप करण्यात आले.

गावकऱ्यांनी असा आरोप केला की काही चिन्हांकन बिंदू सातेरी मंदिराच्या परिसरात दाखवण्यात आले असून, या भागातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारसाला धोका आहे. या पार्श्वभूमीवर सरपंच सूनील नाईक यांच्यावरही काही ग्रामस्थांनी निशाणा साधला.

ग्रामस्थांचा दावा आहे की २०१५ मध्ये त्यांनी अशाच प्रकारच्या प्रकल्पाला विरोध केला होता. तोच जुना प्रस्ताव पुन्हा आणण्यात आला आहे. आमची गावसंस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न आहे. आम्ही यास पुन्हा विरोध करत आहोत आणि बायपासची मागणी करत आहोत, असे स्थानिकांनी स्पष्ट केले. या मागणीसाठी ते थेट मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची पुन्हा भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

ग्रामस्थांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका अधिकाऱ्याने न्यायालयात दिलेल्या प्रतिज्ञापत्रात ६० मीटर जमीन संपादनाची आवश्यकता

पान २ ▶

# शाळांना शैक्षणिक कामगिरीच्या नोंदी ठेवण्याचे निर्देश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** शिक्षण संचालनालयाने गोव्यातील सर्व सरकारी आणि अनुदानित माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांना दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीची नोंदी ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. शाळांना या कामासाठी अधिकृत भेटी दरम्यान तपासणी पथकांकडून पुनरावलोकनासाठी डेटा उपलब्ध करून देणे आवश्यक करण्यात आले आहे. या निर्णयामागे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे निरीक्षण करण्याचे आणि भविष्यातील शिक्षण नियोजनासाठी आधार तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० च्या अंमलबजावणीच्या दृष्टीने, शिक्षण विभागाने सर्व शाळांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक भेटी आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि तांत्रिक कौशल्यांचा अनुभव देणे आणि त्यांना करिअरसाठी तयार करणे हे या निर्देशाचे मुख्य उद्दिष्ट आहे. याशिवाय, शाळांना पॉलिटेक्निक आणि स्थानिक उद्योगांशी सहकार्य करणेही अपेक्षित आहे.

शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांनी जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, एनईपी २०२० मध्ये कौशल्य शिक्षणाला मुख्य प्रवाहात आणण्यावर भर देण्यात आला आहे, ज्याची सुरुवात माध्यमिक शालेय स्तरावर व्यावसायिक अनुभवांपासून होते. धोरणानुसार, प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक व्यावसायिक/तांत्रिक कौशल्य शिकले पाहिजे आणि त्यांना विविध कौशल्यांसोबत ओळख करून दिली पाहिजे. हे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सुरुवातीच्या टप्प्यापासूनच आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करण्याच्या एनईपीच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे, जे त्यांची भविष्यातील व्यावसायिक आणि वैयक्तिक वाढ घडविण्यासाठी मदत करेल.

परिपत्रकानुसार, शाळांना

पान २ ▶

# चिंचणीमध्ये महिलांसाठी टेलरिंग आणि एम्ब्रॉयडरी प्रशिक्षण सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** महिला सक्षमीकरण आणि कौशल्य विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, चिंचणी - देवसू ग्रामपंचायतीने गोवा सरकारच्या हस्तकला, वस्त्रोद्योग आणि कॉयर विभागाच्या सहकार्याने स्थानिक महिलांसाठी टेलरिंग व एम्ब्रॉयडरी प्रशिक्षणाचा प्रारंभ केला आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन सेंट मेरी ऑफ द एंजल्स कॉन्व्हेंट हायस्कूल, चिंचिणीच्या मुख्याध्यापिका सिस्टर फ्लेव्हिया वास यांच्या हस्ते शाळेच्या आवारात झाले. यावेळी स्वयंपूर्णा मित्रा डॉ. मेडोरा डिकोस्टा, ग्रामपंचायत सदस्य, महिला आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षक पूनम देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांना टेलरिंग व एम्ब्रॉयडरीचे सखोल प्रशिक्षण दिले जात असून, त्यातून महिलांना स्वयंरोजगार व लघुउद्योग स्थापनेसाठी प्रेरणा मिळणार आहे.

उद्घटनप्रसंगी बोलताना सरपंच फ्रँक व्हिएगस म्हणाले, या उपक्रमातून महिलांना सक्षम बनवण्याचा आमचा उद्देश असून, स्थानिक उद्योजकतेला चालना देण्याचा आमचा व्यापक दृष्टीकोन आहे. शासनाच्या सहकार्याने अशा आणखी संधी निर्माण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

मुख्याध्यापिका सिस्टर फ्लेव्हिया वास यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले, हा कोर्स केवळ

पान २ ▶

# मिशनरीज सेवा थांबवण्याचा निर्णयावरून असिस्टेन्सिया गोवा वर टीका

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २२ :** पणजीतील सांत इनेज येथे मिशनरीज ऑफ चॅरिटी संस्थेच्या आश्रयगृहाने ४९ वर्षांच्या सेवेचा टप्पा पूर्ण करून परिसर रिकामे करण्याचा घेतलेला निर्णय चर्चेचा विषय ठरला आहे. या निर्णयामुळे असिस्टेन्सिया गोवा या धर्मादाय संस्थेवर तीव्र टीका होत असून, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरी संस्थांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

असिस्टेन्सिया गोवाचे अध्यक्ष नेव्हिल मोंटेरो यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना सांगितले की, आम्ही आमच्या समिती सदस्यांशी चर्चा करून मिशनरीज ऑफ चॅरिटीला त्याच ठिकाणी कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन करू. त्यांनी स्पष्ट केले की, संबंधित मालमत्ता संस्थात्मक क्षेत्रात मोडते आणि तिचा व्यावसायिक वापर केला जाणार नाही.

मोंटेरो पुढे म्हणाले की, २२ मार्च २०२५ रोजी मिशनरीज ऑफ चॅरिटीकडून प्राप्त झालेल्या पत्रामुळे आम्हाला धक्का बसला. त्यांनी हे संपूर्ण परिसर असिस्टेन्सिया गोवालाच परत करण्याचा निर्णय घेतल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.मोंटेरो आणि इतर व्यवस्थापकीय समिती सदस्यांनी स्पष्ट केले की, या जागेचा काही भाग मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सामाजिक उपक्रमांसाठी दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्यावर देण्याचा विचार सुरू होता. २०१४ मध्ये दोन्ही संस्थांमध्ये एक करारही झाला होता. या अंतर्गत, परिसरातील जीर्ण अवस्थेतील इमारतीचे पुनर्बांधणी करून एक नवीन एकमजली इमारत उभारण्याचा प्रस्ताव होता, ज्याला उत्तर गोवा नियोजन व विकास प्राधिकरणाची मंजुरी मिळालेली होती. मात्र, हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरलेला नाही.

जमिनीसंबंधी झोनिंगबाबत तपशील न पाहताच आरोप केले जात आहेत, असे मोंटेरो यांनी स्पष्ट केले. समितीच्या म्हणण्यानुसार, जागेच्या ६० टक्के भागाचा वापर मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सेवेसाठी केला जाणार होता, तर उर्वरित ४० टक्के भाग संस्थेकडे राहणार होता.

आमचे ध्येय आणि उद्दिष्ट समाजातील वंचित, गरजू व निराधार व्यक्तींना मदत करणे हेच आहे. मिशनरीज ऑफ चॅरिटी या उद्दिष्टांशी सुसंगत सेवा देत होते, असे मोंटेरो म्हणाले. मात्र, त्यांनी एकतर्फी निर्णय घेतल्याचेही त्यांनी नमूद केले.

कोलकाता येथील मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या मुख्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनात त्यांनी सेवा बंद करण्यामागील कारणे स्पष्ट केली आहेत. सुपीरियर जनरल सिस्टर एम. जोसेफ एमसी यांनी सांगितले की, खूप विचार व प्रार्थनेनंतर आम्ही हे केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सिस्टर्सची संख्या कमी होत आहे, अनेक सिस्टर्स वृद्ध झाल्या असून त्यांना आजारपणामुळे मर्यादा येत आहेत. त्यामुळे ही सेवा सुरू ठेवणे शक्य होत नाही.पणजी येथील महिलांची काळजी आता गोव्यातील इतर तीन केंद्रांमध्ये केपे, करमळी आणि फातर्पा येथे घेतली जाणार आहे. करमळी येथील सिस्टर्स, पणजीमधील गरजूंना सेवेमार्फत मदत करत राहतील, असेही सिस्टर जोसेफ यांनी स्पष्ट केले.

या निर्णयावर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रसिद्ध वकील ॲड. रुई फरेरा यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले, ही घटना त्रासदायक व धक्कादायक आहे. कॅथोलिक धर्मसंस्था सामाजिक कार्यातून हद्दपार करण्याचा हा प्रयत्न असून बिल्डर लॉबीच्या दबावाला बळी पडल्याचा संशय आहे.

बायलांचो साद या सामाजिक संस्थेच्या संयोजिका डॉ. सबिना मार्टिन्स यांनी मिशनरीज ऑफ चॅरिटीच्या सेवेचे कौतुक करत म्हटले, ही संस्था फक्त महिलांनाच नव्हे तर समाजातील अन्य दुर्बल घटकांनाही आसरा देत होती पणजीसारख्या शहरात निवारा गृहांची नितांत गरज आहे. त्यामुळे ही सेवा असिस्टेन्सिया गोवाने सुरू ठेवावी. दरम्यान, कॅरिटास गोवाचे संचालक फादर मॅव्हरिक फर्नांडिस यांनी, मिशनरीज ऑफ चॅरिटीवर कोणताही दबाव टाकल्याचे आरोप फेटाळले आहेत. जर असिस्टेन्सिया गोवाने खरोखर प्रामाणिकपणे वागले असेल, तर त्यांनी पुढाकार घेऊन मिशनरीज ऑफ चॅरिटीकडे परत येण्याची विनंती करावी, असे फादर फर्नांडिस यांनी सांगितले.